केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असंसर्गजन्य आजार (NCD Flexipool) कार्यक्रमांसाठी सर्वसाधारण (General) योजनेंतर्गत सन २०१७-१८ मधील केंद्र हिश्श्यापोटी रू. ३८५४.०० लक्ष व राज्य हिश्श्यापोटी रु.२५६९.३३ अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएचएम-२०१७/प्र.क्र.५८९/आ-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४००००१.
दिनांक : ४ जानेवारी, २०१८.

वाचा :-

१) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२७०३४/३८/२०१७-NHM(F)/५, दिनांक ४, डिसेंबर २०१७ चे पत्र.
२) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२७०३४/३८/२०१७-NHM(F)/६, दिनांक ४, डिसेंबर २०१७ चे पत्र.
३) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/ कें. रा.हि./७२४२२-४२९/२०१७-१८, दिनांक ८ डिसेंबर, २०१७ चे पत्र..

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र शासनाने उपरोक्त आदेशान्वये असंसर्गजन्य आजारांशी संबंधित योजनांसाठी NCD Flexipool ६०% केंद्र हिश्श्यापोटी सर्वसाधारण (General) वर्गवारी करिता सन २०१६-१७ साठी पहिला हफ्ता वितरीत केला असून ६०% केंद्र हिस्सा त्यास समरुप ४०% राज्य हिश्श्याचे अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राज्यामध्ये राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सर्वसाधारण (General) लाभार्थ्यांकरिता सन २०१७-१८ साठी ६०% केंद्र हिश्श्यापोटी रु. ३८५४.०० लक्ष व ४०% राज्य हिश्श्यापोटी रु. २५६९.३३ लक्ष इतकी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च खालीलप्रमाणे नमूद केलेल्या योजना निहाय ६०% केंद्र हिश्श्यापोटी व ४०% राज्य हिश्श्यापोटी नमूद लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

केंद्र हिस्सा ६०% मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ०६, सार्वजनिक आरोग्य; ८००-इतर खर्च केंद्र पुरस्कृत योजना			
अ. क्र.	योजना	लेखाशिर्ष	वितरित निधी (रु.लाखात)
१	NPCB	(०१) (२९) राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F२६४ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१५१७.४४
२	NMHP	(०१) (३१) राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F२८२ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१८५.४१
३	NTCP	(०१) (३७) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F३४४ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	४३६.०४

४	NPCDCS	(०१) (४१) राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग व पक्षघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) २२१०F३८२ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१५१९.३६
			३८५४.००

राज्य हिस्सा ४०% मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ०६, सार्वजनिक आरोग्य; ८००- इतर खर्च केंद्र पुरस्कृत योजना			
अ. क्र.	योजना	लेखाशिर्ष	वितरित निधी (रु.लाखात)
१	NPCB	(०१) (३०) राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा ४० टक्के) २२१०F२७३ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१०११.६३
२	NMHP	(०१) (३२) राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा ४० टक्के) २२१०F२९१ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१२३.६१
३	NTCP	(०१) (३८) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा ४० टक्के) २२१०F३५३ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२९०.६९
४	NPCDCS	(०१) (४२) राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग व पक्षघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा ४० टक्के) २२१०F३९१ - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	११४३.४०
			२५६९.३३

४. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१६/प्रक्र.८९/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू

खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५००/अर्थोपाय, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०४१४१६२४०४१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: CN = Sanjay R More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.01.04 15:10:06 +05'30'

(सं. रा. मोरे)

महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पुणे

६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
७. सहायक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
८. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१३.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१४.निवडनस्ती (आरोग्य -७) .